ठाणे, शनिवार दि. १८ मे २०२४ वर्ष : १३, अंक : २०, पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक लोकसभेचा संग्राम

महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध

संपादक : चंद्रकांत भोईटे

कलम ३७० हटवणारा मोदी हाच संविधानाचा एकमेव रक्षक

शिवतीर्थवरून नरेंद्र मोदींचं शरद पवारांना सावरकरांच्या मुद्द्यावरून आव्हान; म्हणाले राहुल गांधींकडून....

मुंबई: माझ्याकडे १० वर्षाच्या रिपोर्ट कार्ड आहे, आणि पुढच्या २५ वर्षांचा रोडमॅप आहे. पण इंडिया आघाडीकडे काय आहे? जेवढे पक्ष तेवढे पंतप्रधान त्यांच्याकडे आहेत. त्यांची नजर ही महिलांच्या मंगळसूत्रावर आणि मंदिरातल्या सोन्यावर आहे अशी घणाघाती टीका नरेंद्र मोदींनी काँग्रेस आणि विरोधी आघाडीवर केली. मुंबईकरांनी बाहेर पडून जास्तीत जास्त मतदान करावं, त्यांचे प्रत्येक मत हे मोदींना जाणार असंही ते म्हणाले. यावेळी इतिहासातील सर्व रेकॉर्ड मोडणार असून भारत जगातला सर्वात बलशाली देश म्हणून उभारणार आहे असा विश्वास नरेंद्र मोदींनी व्यक्त केला.

नरेंद्र मोदींच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे –

■ ज्यांचं वय हे ७० वर्षांपेक्षा जास्त आहे त्यांच्या रुग्णालयातील मोफत उपचाराची, जबाबदारी ही मोदीची असेल.

भाजप सत्तेत आल्यानंतर मी देशाला पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनवली, येत्या काळात भारत तिसऱ्या क्रमांकांची अर्थव्यवस्था असणार आहे.

■ मी तुमच्या मुलांना एक विकसित भारत देऊन जाणार आहे. त्यासाठी मी २४ तास देशासाठी काम करणार आहे. निराशेच्या गर्तेमध्ये असलेल्या लोकांमध्ये आशा निर्माण करणे हे काही चणे खाण्याचं काम नाही. राम मंदिर बनणार नाही, ते अशक्य आहे असं लोकांना ■ वाटायचं. गेल्या ५०० वर्षात जे काही झालं नाही ते मोदीने करून दाखवलं.

काश्मीरमधून ३७० कलम हटवणं हे अनेकांना अशक्य वाटत होतं, आज त्या अशक्यतेला मी गाढून टाकलंय.

■ काँग्रेसने गेल्या ६० वर्षांमध्ये महिलांना आरक्षण देण्याचं स्वप्न दाखवलं, पण मी ते करून दाखवलं.

दहा वर्षांपूर्वी कर्ज मिळणं हे किती अवघड होतं, आज सहजपणे कर्ज उपलब्ध होतंय. आज सर्वसामान्य लोकांनाही कर्ज मिळतंय, त्याची गॅरंटी ही मोदीची आहे.

■ गेल्या १० वर्षात २५ कोटी लोकांना गरीबी रेषेच्या बाहेर काढलं.

■ माझ्याकडे १० वर्षाच्या रिपोर्ट कार्ड आहे, आणि पुढच्या २५ वर्षांचा रोडमॅप आहे. पण इंडिया आघाडीकडे काय आहे? जेवढे पक्ष तेवढे पंतप्रधान त्यांच्याकडे आहेत. त्यांची नजर ही महिलांच्या मंगळसूत्रावर आणि मंदिरातल्या सोन्यावर आहे.

■ काँग्रेसने संपत्तीवर वारसा कर लावण्याची तयारी सुरू केली आहे. **(पान २ वर)**

...तर मोदी पंतप्रधान झालेच नसते

बांद्रा येथील बीकेसी मैदानातमहाविकास आघाडीची सभेत उद्धव ठाकरेंची भाजपावर सडकून टीका

(सविस्तर वृत्त पान २ वर)

एकाधिकारशाही संपवण्यासाठी भाजपाला हद्दपार करण्याची गरज

भिवंडी: देशाची राज्यघटना बदलण्यासाठी ४०० पार चा नारा देणाऱ्या भाजपाच्या एकाधिकारशाहीला संपवण्याची गरज आहे,अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी दिली आहे. ते महाविकास आघाडीचे भिवंडी लोकसभेतील उमेदवार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांच्या प्रचारासाठी पोगावं येथे आयोजित परिवर्तन सभेत बोलत होते. या सभेस दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, दिल्लीचे खासदार संजय सिंह,खासदार सुप्रिया सुळे, राष्ट्रवादी काँग्रेस पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री जितेंद्र आव्हाड,अनिल देशमुख,राजेश टोपे,आरपीआय सेक्युलरचे राष्ट्रीय

अध्यक्ष श्यामदादा गायकवाड, समाजवादी पार्टीचे आमदार रईस शेख, ठाकरे गटाच्या उपनेत्या ज्योती ठाकरे,भिवंडी लोकसभा संपर्क प्रमुख माजी आमदार रुपेश म्हात्रे,जिल्हा प्रमुख विश्वास थळे,काँग्रेस शहराध्यक्ष रशीद ताहीर यांसह मोठ्या संख्येने महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या

शरद पवारांचा भिवंडीत घणाघात

संख्येने महाविकास आघाडीचे पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

या देशातील मंदिर मस्जिद सुरक्षित ठेवणे हे सर्वांची जबाबदारी असताना भाजपा जाणीवपूर्वक दोन समाजात तेढ निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचा आरोप देखील पवारांनी केला. निवडणुकीत पराभव समोर दिसत असताना मोदी यांनी खोट्या केसेस मध्ये अडकवून मला कारागृहात टाकले,जामिनावर बाहेर असताना दिवसरात्र मेहनत करून **(पान २ वर)**

२४ कल्याण लोकसभा मतदारसंघातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व इंडिया महाविकास आघाडीचे उमेदवार सौ. वैशाली दरेकर राणे यांच्या प्रचारार्थ आदरणीय शरद पवार साहेब यांची महाविकास आघाडी परिवर्तन महासभा मुंब्रा येथे संपन्न झाली.

पीआरपी नेते राजाभाऊ चव्हाण यांना मातृशोक

ठाणे – पीआरपीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा चर्मकार नेते राजाभाऊ चव्हाण यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई श्रावण चव्हाण यांचे शुक्रवारी निधन झाले. त्यांच्या

पश्चात तीन मुले, मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मूळच्या मालेगाव तालुक्यातील हिसवाळ या गावातील रहिवाशी असलेल्या लक्ष्मीबाई या आपले पती श्रावण चव्हाण यांच्यासह मुंबईत वास्तव्यास आल्या होत्या. काहीकाळ मुंबईतील रमाबाई आंबेडकर येथे वास्तव्य केल्यानंतर त्या ठाण्यात आल्या. त्या चर्मकार समाजाच्या विविध उपक्रमांमध्ये तसेच चळवळीत सक्रीय होत्या. गेल्या आठवड्यात त्यांना रक्तदाबाचा त्रास वाढल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आज रुग्णालयातून डिस्चार्ज घेऊन गावी जात असताना वाटेतच त्यांचे निधन झाले. उद्या दि. १८ मे रोजी हिवसाळ या गावातील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

शिवसेनेचे ठाणे, ठाण्याची शिवसेना...

चला राखूया धर्मवीरांचा गड अभेद्य पुन्हा...

ठाणे, दि. १७ – ठाणे लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचारासाठी आज शुक्रवारी नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य प्रचार रॅलीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सहभागी झाले. वंदनीय गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे साहेबांनी अभेद्य राखलेला हा गड यापुढेही अभेद्य राखण्याचे आवाहन त्यांनी मतदारांना केले.

नवी मुंबईतील कोपरखैरणे, घणसोली आणि ऐरोली येथे काढण्यात आलेल्या या प्रचार रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य नागरिक सहभागी झाले होते. स्थानिक मतदारांनी जागोजागी मोठ्या उत्साहात फुले उधळत, फटाके वाजवत मोठ्या जल्लोषात स्वागत केले. नवी मुंबईकरांनी दिलेला उदंड प्रतिसाद महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या विजयाची जणू ग्वाहीच देत होता. काहीही झाले तरीही विजयश्री खेचून आणायचीच हा विश्वास या प्रचार रेलीद्वारे

व्यक्त करण्यात आला.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, राज्य शासनाने गेल्या २ वर्षात तर आणि केंद्र शासनाने गेल्या १० वर्षात केलेल्या विकासकामांच्या जोरावर ही निवडणूक पार पडत आहे. देशाला प्रगतीकडे घेऊन जाणारी अशी ही निवडणूक असून या **(पान २ वर)**

मिसेस मुख्यमंत्रीही प्रचारात....

■ ठाणे लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्नी सौ. लताताई एकनाथ शिंदे यांनी प्रचारात सहभागी होत कशिश पार्क आणि आजूबाजूच्या परिसरातील मतदारांशी संवाद साधला. यावेळी मा. नगरसेवक विकास रेपाळे आणि मा. नगरसेविका नम्रता भोसले यांच्यासह नागरिकांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले.

गद्दारांना असा गाडा की, गद्दारीचा कीडा पुन्हा कल्याण-डोंबिवलीमध्ये वळवळता कामा नये

डोंबिवली : गद्दारांला असा गाडा की, पुन्हा कित्येक पिढ्या कल्याण-डोंबिवलीमध्ये गद्दारीचा किडा वळवळता कामा नये, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी परखड टीका केली आहे. गद्दाराच्या विरुद्ध मला निसटता विजय नकोय, गद्दाराला गाडा, असं ठाकरेंनी म्हटलं आहे. कल्याण-डोंबिवली मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार वैशाली दरेकर यांच्या प्रचारासाठी उद्धव ठाकरे यांची गुरुवारी डोबिंवलीमध्ये सभा पार पडली, त्यावेळी ते बोलत होते.

गद्दारांच्या गॅसच्या फुग्याला टाचणी कशी मारतो बघा

उद्धव ठाकरे यांनी सांगितलं की, काही जण आपली चोरलेली निशाणी घेऊन फिरत होते. आमची निशाणा चोरतोय आणि चोर तो चोर वर शिरजोर. हे गद्दार जे आज आपल्य अंगावरती येत आहेत, जरा ४ तारखेपर्यंत थांबा, तुमचा गॅसचा फुगा झालाय, त्याला टाचणी कशी मारतो, ते बघा, असं म्हणत त्यांनी बंडखोरांना इशारा दिला आहे. **(पान २ वर)**



भिवंडी लोकसभेतून अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांनाच प्रचंड मतांनी निवडून द्या!

कल्याण (प्रतिनिधी) : निलेश सांबरे यांच्या प्रचाराला मला येता आलं याचं मी भाग्य समजतो तुम्ही किती आहेत आणि कोण विरोधात आहे हा विषय महत्त्वाचा नाहीये तर आपण किती आहोत आणि काय आहोत हे महत्वाचे आहे. आज खरी परीक्षा उमेदवाराची नाही तर मतदाराची आहे. मी जेव्हा निवडणुकीला उभा होतो तेव्हा माझ्या सोबत कोणताच पक्ष नव्हता, कोणताच धर्माचा झेंडा नव्हता की दिल्ली मुंबईचा कोणता मोठा नेता नव्हता. आपल्यासारखी जनता होती म्हणून बच्चू कडू निवडून आला. हे जर एका मतदारसंघात होऊ शकतं तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात एक कार्यकर्ता आम्ही का निवडून देत नाही हा खऱ्या अर्थाने प्रश्न आहे. असे प्रतिपादन प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते आमदार बच्चू कडू यांनी भिवंडी लोकसभेतील अपक्ष उमेदवार जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष निलेश सांबरे यांच्या कल्याण येथील प्रचार सभेत बोलताना केले.

■ प्रहार'चे नेते बच्चू कडू यांचे कल्याण-भिवंडीकरांना आवाहन

■ कल्याण-आंबिवली येथे चौकाचौकात विजय निर्धार यात्रेचे जल्लोषात स्वागत

■ १० आंदोलनाची ताकद एका मतदानात आहे , तेव्हा विचार करूनच मतदान करा - बच्चू कडू

काम करणाऱ्या निलेश सांबरे सारख्या माणसाच्या पाठीशी उभे राहण्यासाठी मजबुतीने एकत्र या आणि त्यांना मोठ्या मतांनी निवडून आणा . गरीबांसाठी कानाकोपऱ्यातून लढणारा एक एक माणूस जरी तयार झाला तरी शेतकरी आणि कष्टकरी हा सुखाने झोपेल म्हणूनच निलेश सांबरे सारखी व्यक्ती ही या व्यवस्थेत आली पाहिजे . असे सांगत आमदार कडू यांनी निलेश सांबरे यांना निवडून आणण्यासाठी उपस्थित जनतेला आवाहन केले.

एक शेतकऱ्याचा मुलगा त्या विरोधात भारतीय जनता पार्टी आणि दुसरा उमेदवार आहे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या दोन उमेदवाराविरुद्ध माझ्यासोबत समविचारी असलेल्या महाराष्ट्रातील अनेक संघटना, अनेक जिल्ह्यातून आलेले पदाधिकारी, शेतकरी बांधव व इतर सर्व समाजाचे तसेच विदर्भ, मराठवाडा उत्तर महाराष्ट्र ,पश्चिम महाराष्ट्रातून आलेल्या हजारोंच्या संख्येने सर्व पदाधिकारी यांच्या ताकतीने मी निवडणूक लढत आहे असे प्रतिपादन जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष व भिवंडी लोकसभेचे अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांनी सभेत बोलताना केले. दहा वर्षांमध्ये इथे असलेल्या खासदाराने काय काम केलं तर फक्त दिवाळी पहाट आणि गुढीपाडव्या व्यतिरिक्त खासदार कधी या कल्याण नगरीला दिसलेले नाहीत. आणि दुसरे उमेदवार असलेले सुरेश म्हात्रे (बाळ्यामामा) हे फक्त फक्त निवडणुकीचा फॉर्म भरायला २०१४ ला दिसले होते त्यानंतर २०१९ फॉर्म भरतो म्हणून सांगितलं होतं आणि आता २०२४ तास निवडणूक व्हायच्या अगोदर तीन महिने आधी शिंदे साहेबांकडून परत ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये आलेत असे सांगत विरोधकांचा समाचार घेतला .

एका शेतकऱ्याच्या मुलाने ठरवलं तर तो काय नाही करू शकत ? याचे उदाहरण म्हणजे आज झडपोली सारखा विक्रमगड तालुक्यातील छोट्याशा २०० लोक वस्तीच्या गावामध्ये २००० विद्यार्थ्यांना कायमस्वरूपी शिक्षण दिले जाते. गरिबांच्या मुलांनाही श्रीमंतांच्या मुलाप्रमाणे चांगले गुणवत्तेचे शिक्षण मिळालं पाहिजे यासाठी उच्च दर्जाच्या शाळा उघडल्या जातात त्याही कुठल्याही प्रकारचे शुल्क न घेता.शेतकऱ्यांची शेतमजुरांचे गोरगरिबांचे मुलं डॉक्टर झाले पाहिजेत . स्पर्धा परीक्षेच्या फाउंडेशन करून स्पर्धा परीक्षांमध्ये मोठे अधिकारी झाले पाहिजेत यासाठी देशातला पहिला प्रयोग जिजाऊ संस्थेने चालू केला आहे. इयत्ता नववीपासून सुरुवात केलेली गएए /छएएढ उक्एए चे क्लासेस ची सुरुवात करण्यात आलेली आहे. हे व्हिजन आपल्या जिजाऊचे आहे असे देखील सांबरे म्हणाले .

त्यासाठी गुजरातच्या अहमदाबाद वरून आयआयटी टिचर आपल्या मुलांना चांगल्या गुणवत्तेचे शिक्षण देण्यासाठी बोलावले. कारण आपल्याला आपल्या मुलांना चांगल्या गुणवत्तेचे शिक्षण दिले पाहिजे. यातील माझ्या समोरच्या एका जरी उमेदवाराने सांगावे की मी दोन मुलांना शिकवले किंवा दोन-चार विध्यार्थ्यांना माझ्या मुलासारखे शिक्षण दिले आहे. तसेच आरोग्याबाबातही या मतदारसंघात खेळ खंडोबा चालला आहे. कधीतरी त्या खासदारांनी इथल्या सरकारी रुग्णालयात जाऊन बघितले पाहिजे की आमचे बांधव कशा अवस्थेत उपचार घेत आहे. अशा लोकप्रतिनिधींकडून समाजाला काहीच अपेक्षा नाहीत. असे सांगत विरोधकांवर टीकेची झोड उठवली .

सर्वांना आपल्या तालावर नाचवणारा एकच प्राणी तो म्हणजे माणूस आणि त्याला कोणी ५०० -१००० ला विकत घ्यावे इतका आता तो साधा राहिला नाही. त्यामुळे पैशे वाटून मत विकत घेणाऱ्यानी आता याचे भान ठेवावे. तुमच्या आमचे आणि आपल्या मुलाबाळांचे भवितव्य केवळ परिवर्तनाने शक्य आहे आणि ते परिवर्तन निलेश सांबरे यांच्या माध्यमातून होणार आहे. तेव्हा विचार करून मतदान करा असे आवाहन जिजाऊच्या भिवंडी लोकसभा क्षेत्र प्रमुख मोनिका पानवे यांनी उपस्थितांना केले. तर संपादक कैलाश म्हापदी यांनी देखील आपल्या भाषणात बोलताना सांगितले सामाजिक काम हे जिजाऊ संघटनेला नवीन नाही हा आमचा दिनक्रम आहे आमची कोणाची स्पर्धा नाही जो आमच्यापेक्षा चांगले काम करेल तो आमचा स्पर्धक असेल .

याप्रसंगी हे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी असलेले जिल्हाध्यक्ष मदन दराडे , दानिश एजाज अहमद शेख ज्ञानेश्वरजी सोनवणे तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते भाऊ भोईर यांनी आपला जाहीर पाठिंबा या सभेत दिला. सकल मराठा समाजाचे बबन जरांगे पाटील, मराठा सेनेचे रविंद्र कदम यांच्यावतीने देखील जाहीर पाठिंबा या वेळेला दिला.

यावेळी मंचावर एमआयएम जनरल सेक्रेटरी ॲड अमोल कांबळे, मंगल कांगणे, अमर कुंडूकर, प्रहार जिल्हाध्यक्ष हितेश जाधव, प्रहार ठाणे जिल्हाध्यक्ष ॲड स्वप्नील पाटील, खानदेश सेनेचे सुहास बोंडे, शिवाजी काळे (सोलापूर), सकल मराठा समाजाचे बबन जरांगे पाटील आणि रवींद्र कदम, रविश तांडेल, माजी नगरसेवक फैझल जलाल, अपक्ष उमेदवार सुरेश पंडागळे व चंद्रकांत मोटे, राष्ट्रवादी युवा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मदन दराडे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते भाऊ भोईर, सलीम जमादार, समीर खान यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. तत्पूर्वी सांबरे यांच्या प्रचारानिमित्त भव्य प्रचार रॅली देखील आंबिवली-कल्याण शहरातून काढण्यात आली. गाळेगाव येथून प्रारंभ झालेली प्रचार रॅली आरएस टेकडी, जेतवननगर, मोहोने बाजारपेठ, अटाळी, वडवली, शहाड मार्गे कल्याण शहरात आली. पुढे प्रेम ऑटो, भोईरवाडी, साई चौक, बेतुरकर पाडा, सहजानंद चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अहिल्याबाई चौक, टिळक चौक, पार नाका, चिराग हॉटेल, मौलवी कंपाऊंड, गोविंदवाडी, कोळीवाडा, आंबेडकर रोड, अन्सारी चौक, डॉन चौक, मछली बाजार, दुर्गाडी किल्ले, आधारवाडी, असे मार्गक्रमण करीत ही रॅली वासुदेव फडके मैदानात पोहोचली. तेथे तिचे भव्य विजय निर्धार सभेत रुपांतर झाले. रॅली दरम्यान, ठिकठिकाणी निलेश सांबरे यांचे फटाक्यांची आतषबाजी व पुष्पवृष्टी करीत जोरदार स्वागत करण्यात आले. नागरिकांनी हजारोच्या संख्येने गर्दी करीत सांबरे यांना जोरदार पाठींबा दर्शविला तर महिलांनी चौकाचौकात सांबरे यांना औक्षण करीत त्याच्या विजयाची कामना व्यक केली. आबालवृद्ध निलेश सांबरे यांच्याशी हस्तांदोलन करीत त्यांना शुभेच्छा देतानाचे चित्र पाहायला मिळाले.

निवडणूक प्रचाराच्या अखेरच्या दिवशी १८ मे रोजी देखील निलेश सांबरे यांच्या प्रचारार्थ भिवंडी शहरातून भव्य रोड शो आणि प्रचार सभा घेणार असल्याचे असल्याचे जिजाऊ संघटनेच्या वतीने सांगण्यात आले आहे. याप्रसंगी मतदारांना संबोधित करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर हे उपस्थित राहणार आहेत.

एकाधिकारशाही संपवण्यासाठी भाजपाला हद्दपार करण्याची गरज

(पान १ वरून) २१ दिवसात भाजपाला पराभूत करूनच कारागृहात परत जाईल असा निर्धार व्यक्त करीत देशाला वाचविण्यासाठी मतदानाची भिक मागण्यासाठी मी भिवंडीत आलो आहे असे वक्तव्य दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केले.दिल्लीत गरिबांच्या मुलांसाठी मोफत शिक्षण, मोफत वीज,मोफत रुग्णालय उपचार मोफत औषध देण्याचे काम आम्ही करतो दिल्लीमध्ये ५०० मोहल्ला क्लिनिक बनवल्या मोदी यांनी देशभरात ५ हजार मोहल्ला क्लिनिक सुरू केल्या असता तर त्यांचा सन्मान केला असता.

रशियाचा नेता पुतीन याने विरोधकांना मारले कारागृहात टाकले,बांगलादेश व पाकिस्तान मध्ये सुध्दा असेच करुन सत्ता हस्तगत केली ,भारताकडून जग शिकते पण मोदी बांगलादेश पाकिस्तान यांच्या कडून शिकून तसेच काम भारतात करू इच्छितात असा आरोप केजरीवाल यांनी यावेळी केला.नरेंद्र मोदी हे भयग्रस्त असून पक्षात ७५ वर्षांवरील नेत्यांना राजकारणातून निवृत्ती देणारे मोदी देखील पुढील वर्षी ७५ वर्षांचे होणार असल्याने ते मत मागत आहेत ते अमित शहा यांना प्रधानमंत्री बनवण्यासाठी असा आरोप देखील केजरीवाल यांनी केला.

चला राखूया धर्मवीरांचा गड अभेद्य पुन्हा...

(पान १ वरून) निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे हात बळकट करण्यासाठी महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांनाच मोठ्या मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

अटल सेतू, मुंबई-पुणे मिसिंग लिंक, ऐरोली-काटई बोगदा, नवी मुंबई मेट्रो, नवीन विमानतळ यामुळे नवी मुंबई शहराचा चेहरामोहरा आगामी काळात पूर्णपणे बदलणार असून एक सुनियोजित आणि सर्व सुविधांनी संपन्न असे शहर म्हणून ते ओळखले जाणार आहे. त्यामुळे विकासाचा वेग कायम राखायचा असेल तर महायुतीला पर्याय नाही असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि वंदनीय गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे साहेब यांनी मोठ्या कष्टाने उभी केलेली शिवसेना आज काँग्रेसच्या दावणीला बांधली गेली आहे. मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी यांना प्रचारासाठी लागतो आहे. पाकिस्तानची भाषा बोलणाऱ्या काँग्रेसची हे पाठराखण करत आहेत. तर महाराष्ट्र भवनाला विरोध करणाऱ्या फारूख अब्दुल्लाच्या मांडीला मांडी लावून हे बसले आहेत. त्यामुळे राम मंदिर उभारणाऱ्या, ३७० कलम हटवणाऱ्या तसेच सर्जिकल स्ट्राईक करून पाकिस्तानला जशास तसे उत्तर देणाऱ्या देशभक्त पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवण्यासाठी महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांनी प्रचंड बहुमताने निवडून लोकसभेत पाठवावे असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ भाजप नेते, माजी मंत्री व आमदार गणेश नाईक, माजी आमदार संदीप नाईक, आमदार भरतशेठ गोगावले, माजी आमदार रवींद्र फाटक, महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के, नवी मुंबईचे माजी विरोधी पक्षनेते विजय चौगुले, शिवसेना उपनेते विजय नहाटा, माजी नगरसेवक ममित चौगुले तसेच महायुतीच्या घटक पक्षातील सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नवी मुंबईकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गद्दारांना असा गाडा की, गद्दारीचा कीडा पुन्हा कल्याण-डोंबिवलीमध्ये वळवळता कामा नये

(पान १ वरून) **कल्याण-डोंबिवलीमध्ये गद्दारीचा किडा वळवळता कामा नये** – उद्धव ठाकरे म्हणाले, वैशाली ताई आता तुमची जबाबदारी आहे. गद्दाराच्या विरुद्ध मला निसटता विजय नकोय. असा गद्दाराला गाडा की, पुन्हा कित्येक पिढ्या कल्याण-डोंबिवलीमध्ये गद्दारीचा किडा वळवळता कामा नये, असं आवाहन उद्धव ठाकरे यांनी कल्याण-डोंबिवलीकरांना केलं आहे.

गुजरातला नेलेलं महाराष्ट्राचं वैभव परत आणणार

महाराष्ट्रात आणि देशात इंडिया आघाडीचं सरकार येणारच. इंडिया आघाडीचं सरकार आल्यावर महाराष्ट्राची लूट थांबवणार. महाराष्ट्राचं वैभव जे यांनी गुजरातला नेलं आहे, ते लूटलेलं वैभव महाराष्ट्रात आणल्याशिवाय राहणार नाही. शेतकऱ्यांसाठीही वचनं दिली आहेत. मोदीजी तुम्ही १० वर्ष सत्तेत होतात आणि आज तुम्हाला शेतकऱ्यांबद्दल कळवळा आला आहे, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी टीका केली आहे.

अमित शाह तुम्ही का उलटे झालात? – अनेकदा आम्ही तुम्हाला सांगितलं की, मराठी भाषेला अभिजाचत दर्जा द्या, अजून का दिला नाही. आज अमित शाह कुठेतरी बोलले, मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करा, जो गोहत्य करेल त्यांना आम्ही उलटे टांगू, मग आजपर्यंत १० वर्ष त्यांना तिरकं टांगलं होतं का. बरं गोहत्या केल्यावर त्यांना उलटं टांगणार, पण मणिपूरमध्ये महिलांचे जे धिंडवडे काढले त्यांच्या सोबत अमित शाह तुम्ही का उलटे झालात. तुमचं का खाली डोकं वर पाय झालं. आम्हाला पहिलं मातेचं रक्षण करायचंय, गोमातेचं आम्ही नंतर करणार, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

मुरबाड मधील गजानन सुरोशी झाले भावूक..

नलेश सांबरेंनी माझे डोळ्याचे ऑपरेशन केले.. मी आणि माझा परिवार त्यांचा ऋणी आहे..

सांबरे लोकसभा निवडूक जिंकावे अशी परमेश्वराकडे केली प्रार्थना...

भिवंडी लोकसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार तसेच जिजाऊ संघटना महाराष्ट्र अध्यक्ष निलेश सांबरे यांनी केलेल्या समाजकार्यामुळे असंख्य नागरिकांना लाभ झाल्याच्या अनेक घटना आपण ऐकल्या आहेत. असाच एक अनुभव सांबरे यांच्या प्रचार दौऱ्यादरम्यान मुरबाड मध्ये ऐकायला मिळाला. येथील रहिवासी गजानन सुरोशी हे काही वर्षांपूर्वी डोळ्याच्या आजाराने ग्रस्त होते. पण आर्थिक अडचण असल्यामुळे त्यांना डोळ्याचे ऑपरेशन करणे शक्य होत नव्हते. त्यामुळे सुरोशी हे अत्यंत त्रासात जगत होते आणि आपण अंध होऊ असे त्यांना वारंवार वाटत होते.

सुदैवाने ते जिजाऊ संघटना आणि निलेश सांबरे यांच्या संपर्कात आले आणि तिथून त्यांच्या नशिबाने कलाटणी घेतली. जिजाऊचे स्वयंसेवक त्यांना तातडीने झडपोली येथील जिजाऊच्या श्री भगवान महादेव सांबरे रुग्णालयात घेवून गेले. येथे त्यांच्या डोळ्यांच्या शस्त्रक्रिया आणि औषधोपचार पूर्णपणे मोफत करण्यात आले. तसेच ते पूर्णपणे बरे होईपर्यंत जीजूच्या स्वयंसेवकांनी त्यांची काळजी घेतली. यामुळे आपल्या डोळ्यांना नवा प्रकाश भेटल्याची भावना गजानन सुरोशी यांनी व्यक्त केली. निलेश सांबरे हे मुरबाडमध्ये प्रचार दौऱ्यासाठी येत आहेत ही बातमी कळताच गजानन सुरोशी त्यांना भेटण्यासाठी आवर्जून आले. सांबरे यांना भेटल्यानंतर ते अत्यंत भावूक झालेले दिसले. तसेच सांबरे हे खरोखर एक देवदूत असल्याची भावना त्यांनी बोलून दाखवली. माध्यमांशी बोलतांना सुरोशी म्हणाले की निलेश सांबरे यांनी माझ्या डोळ्यांच्या ऑपरेशनसाठी जे सहकार्य केलं त्यासाठी मी आणि माझा पूर्ण परिवार सांबरे यांचा ऋणी आहे. आणि या निवडणुकीत निलेश सांबरे हे भरघोस मतांनी विजयी व्हावे यासाठी मी परमेश्वराकडे प्रार्थना करतो. त्याचप्रमाणे त्यांनी केलेल्या समाजकार्याच्या बळावर त्यांची समाजातली उंची वाढतच जावो असा मी परमेश्वराकडे आशीर्वाद मागतो...

निलेश सांबरे यांच्या समाजसेवेच्या पार्श्वभूमीवर, त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना ही निवडणूक अवघड जाईल असे चित्र सध्या दिसत आहे. त्यामुळे भिवंडी मतदारसंघातील ही तिरंगी लढत दिवसेंदिवस चुरशीची होत चालली असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे मतदार राजा नक्की कोणाच्या गळ्यात विजयश्रीची माळ घालणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

...तर मोदी पंतप्रधान झालेच नसते

उद्धव ठाकरेंची भाजपावर सडकून टीका

मुंबई : प्रमोद महाजन नसते तर शिवसेना आणि भाजपा युती झाली नसती. प्रमोद महाजन असते तर नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले नसते, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली. आज महाविकास आघाडीची सभा बांद्रा येथील बीकेसी मैदानात आयोजित करण्यात आली होती. यावेळी उद्धव ठाकरे यांनी नरेंद्र मोदी, अमित शाह आणि भाजपाचा चांगलाच समाचार घेतला. चार जूननंतर तुम्ही केवळ मोदीच राहणार आहात, भाडोत्री फौज घेऊन उद्धव ठाकरेला संपवायला आलेत. संपवण्याचा प्रयत्न करा, हा महाराष्ट्र तुमचे राजकारण याच मातीत गडल्याशिवाय राहणार नाही, अशी सडकून टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

मुंबईत तुमच्या कंपन्या दादागिऱ्या करतात. मी सर्वच गुजरातींविरोधात नाही. गुजरातीसुद्धा आमचाच आहे. पण मोदींमुळे दोन-पाच मस्तवाल झालेत त्यांना वेळीच सुधरा. मराठी माणसाला प्रवेश दिला नाही तर तुमचे दरवाजे बंद करून तुम्हाला गुजरातला पाठवणार. मराठी, गुजरात, हिंदी, मुस्लमान एकत्र राहतो. त्यात मिठाचा खडा टाकू नका, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी भाजपावर निशाणा साधला. तसेच, नकली शिवसेना, नकली संतानवरूनही उद्धव ठाकरे यांनी यांनी मोदींचा समाचार घेतला. ते म्हणाले की, तुम्ही तुमचं सांगा आम्ही आमचं सांगू, तुम्ही आम्हाला सर्टिफिकेट देणारे कोण आहात? अशी विचारणा त्यांनी केला. जेव्हा इथं काही होत तेव्हा मदतीला सर्वात आधी शिवसैनिक धावून जातो, भाजपा कार्यकर्ता जात नाही. बचाव कार्याला जाऊन हिंदू मुसलमान असं बघितलं नाही. तुमचा पक्ष स्वातंत्र्यलढ्यात नव्हता, संयुक्त महाराष्ट्रमध्ये देखील नव्हता, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

याचबरोबर, कोरोनाच्या वेळेला अजूनही विसरलेले नाही. मी स्वतः अमित शाह आणि नरेंद्र मोदींना फोन करून सांगत होतो, माझ्याकडे उत्तर प्रदेशात राहणारे गावी जाऊ इच्छितात. मी पैसे देतो पण ट्रेन उपलब्ध करून द्या. पण ते नाही म्हणाले. शेवटी काही दिवसांनी सर्वांचा संयमाचा बांध सुटला आणि लोंढेच्या लोंढे निघाले. सात ते आठ लाख लोकांच्या छावण्या उभ्या केल्या. त्यांना जेवण आणि औषधपाणी देत होतो. पण मोदींनी ट्रेन दिली नाही. महाराष्ट्रात एकाही मृतदेहाची विटंबना होऊ दिली नाही, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

अमित शहा म्हणतात, मोदी यांना तिसऱ्या वेळेला पंतप्रधान करायचं. जो कोणी गोंधळ करेल त्याला उलटा टांगून आम्ही सरळ करू. म्हणजे काय? मला कळलं नाही. नेमकं काय करणार आहेत. इकडे तुरुंगात गेलो तरी चालेल पण मोदीसमोर झुकणार नाही असे म्हणणारे अरविंद केजरीवाल आपल्यासोबत आले आहेत. मोदीजी इकडे सगळे मुंबईकर आहेत. हे मुंबईकर जेव्हा संकटात असतात तेव्हा त्यांना मदत करायला घेऊन जातो तो शिवसैनिक जातो भाजपाचा कार्यकर्ता नाही जात कुठे? अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

मोदीजी तुमची भारत माता नेमकी आहे तरी कुठे?

दहा वर्ष ज्यांनी सत्तेचा दुरुपयोग केला, त्यांना कायमचं तडीपार करण्याचा निर्णय मुंबईकरांनी केला पाहिजे. मुंबईमध्ये दोन सभा होत आहेत. एका बाजूला तुम्ही आणि दुसऱ्या बाजूला गद्दार आणि भाडोत्री जनता असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली. तसेच, हुकूमशहा याची नजर कशी असते? राक्षसी? अरे! पंतप्रधान म्हणून शेतकरी तुमच्याकडे कांद्याचा हमी भाव मागतोय. कांद्याला भाव मागतोय. निर्यात बंदी मागतोय. त्यांचे न ऐकता तुम्ही भारत माता की जय! भारत माता की जय! म्हणता. मोदीजी तुमची भारत माता नेमकी आहे तरी कुठे ? कांदा उत्पादक शेतकरी हा सुद्धा भारत माताचा आहे. मणिपूरमध्ये ज्यांचे धिंडवडे काढले गेले त्या महिला सुद्धा भारत माताच आहेत की नाही? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला.

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

Public Notice

Service Request Number : THN/01480/18/24
Inquiry/case No. : ACC/I/300/2024
Name of the Trust : **हनुमान सेवा समिती**

Address of the Trust : हनुमान मंदिर सेवा समिती, रोड नं. २२, वागळे ईस्टेट, ठाणे (प.) ठाणे, ठाणे, ठाणे

Name of the Applicant : श्री. जलाल इब्राहिम मुजावर

To
All Concerned having interest
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

Movable Property

SR	Property Details	Estimated Value
1	Cash In Hand	1000.00

Value of Movable Property : Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

Immovable Property

SR NO	Town Or Village	CS Or Municipal Or Survey No	Area	Assessment Or Judiciary	Tenure Or Nature	Estimated Value
1	Nil	Nil	Nil	Nil	Nil	0.00

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 13/05/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

शिवतीर्थवरून नरेंद्र मोदींचं शरद पवारांना सावरकरांच्या मुद्द्यावरून आव्हान; म्हणाले राहुल गांधींकडून

(पान १ वरून) तुम्ही कमावलेल्या संपत्तीतील ५० टक्के संपत्ती ही काढून घेऊन आपल्या व्होट बँकेला देण्याची तयारी काँग्रेसची आहे.

■ राहुल गांधींकडून सावरकरांवर कधीही बोलू नये असं राष्ट्रवादीच्या शरद पवारांनी सांगावं, पण ते असं करू शकणार नाहीत. कारण लोकसभा निवडणूक झाल्यानंतर राहुल गांधी हे पुन्हा सावरकरांना शिव्या देणार.

■ ज्या कसाबने मुंबईकरांचा जीव घेतला त्याला हे क्लीन चिट देत आहेत. आपल्या लष्करावर टीका करत आहेत.

■ इंडिया आघाडीवाले डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाचा अपमान करत आहेत. आंबेडकर आणि संपूर्ण संविधान सभा ही धर्माच्या आधारावर आरक्षण देण्याच्या विरोधात होती. पण काँग्रेस आता धर्माच्या आधारावर आरक्षण देतंय.

■ कलम ३७० हटवणारा मोदी हाच संविधानाचा एकमेव रक्षक, काँग्रेसवाले संविधान तोडणारे.

मोदींसमोर तोफ धडाडली, राज ठाकरेंच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे

मुंबई - येत्या २० मे रोजी लोकसभा निवडणुकांसाठी मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. त्याआधी महायुती आणि महाविकास आघाडीकडून सभांचा धडका लावण्यात आला. शिवतीर्थावर महायुतीची सभा पार पडली. या सभेला मनसे अध्यक्ष राज ठाकरे (ठ्रक्ष ढहरलज्ञशीू) यांची देखील उपस्थित होती. कारण मनसेच्या गुढीपाडव्याच्या मेळाव्यात राज ठाकरे यांनी महायुतीच्या सरकारला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. त्यानंतर पुणे, कोकण, कल्याण-डोंबिवली आणि आता मुंबई अशा महत्त्वाच्या मतदासंघामध्ये राज ठाकरेंनी सभा घेतल्या. मुंबईतल्या सभेत राज ठाकरेंनी पंतप्रधान मोदींसाठी भाषण केलं आणि त्यांच्यासमोर महाराष्ट्राच्या अपेक्षा ठेवल्या. राज ठाकरे यांच्या भाषणातील महत्त्वाचे १० मुद्दे जाणून घेऊयात.

१. शरद पवार, उद्धव ठाकरेंवर निशाणा – एकनाथ शिंदे, देवेंद्र फडवणीस आणि अजित पवार यांनी भाषणामध्ये उद्धव ठाकरे, शरद पवार यांच्याबद्दल बोलले. पण त्यांच्याबद्दल बोलायची गरज नाही. जे सत्तेत येणार नाहीत, त्यांच्याबद्दल काय बोलायचं?

२. 'मोदीजी नसते तर राम मंदिर झालंच नसतं' – ९० च्या दशकात बाबरी मशिदीचं प्रकरण घडलं, त्यावेळी मुलायम सिंह यादवच्या लोकांनी आमच्या हजारो कारसेवकांना मारलं. शरयू नदीमध्ये प्रेतं फेकून दिलं. ते चित्र माझ्या डोळ्यासमोरुन कधी गेलं नाही. ज्यावेळी बाबरीचा ढाचा पडला, त्यानंतर राम मंदिर बनवू, बनवू असं म्हटलं जात होतं. पण मला तेव्हा वाटलं की राम मंदिर कधी बनणार नाही. मोदीजी होते म्हणून ते राम मंदिर होऊ शकलं अन्यथा ते झालंच नसतं.

३. कलम ३७० आणि काश्मीरचा मुद्दा – इतिहासापासूनच एकच गोष्ट कानावर पडायची की ३७० कलम रद्द झालं पाहिजे. पण इतक्या वर्षात जी गोष्ट होऊ शकली नाही, ती पंतप्रधान मोदींनी करुन दाखवली. त्याच काश्मीरमध्ये आज तुम्ही जाऊन जमीन घेऊ शकता. तो भारतातच एक भाग आहे, हे आता सिद्ध झालं.

४. 'तीन तलाख कायदा मोदींजींमुळे रद्द' – एक प्रकरण सुप्रीम कोर्टात होतं आणि सुप्रीम कोर्टाने शाह बानो या महिलेच्या बाजून तो निकाल लावला होता. सुप्रीम कोर्टाने निकाल लावल्यानंतर राजीव गांधींनी खासदार असताना बहुमतानाच्या जोराने तो निकाल काढून टाकला. त्यामुळे त्या मुस्लिम महिलेला कधीच न्याय मिळू शकला नव्हता. पण तो तीन तलाक कायदाच रद्द केला आणि हिंदुस्थानातील जितक्या मुस्लिम महिला आहेत, त्यांच्यामध्ये एक समाधानाचं वातावरण झालं.

५. औवेसींवर निशाणा : काही मूठभर मुस्लिम आहेत, ओवैसी सारख्या अवलादी आहेत, त्यांचे अड्डे तपासा, तिथं एकदा सैन्य पाठवा आणि त्यांना उध्वस्त करून टाका. म्हणजे देशात सर्वांना सुरक्षित वावरता येईल.

बाप चोरला, पक्ष चोरला, गजनी, अन् अर्धटवराव.... देवेंद्र फडणवीसांचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल

मुंबई - लोकसभा निवडणुकीसाठी शिवाजी पार्क मैदानात महायुतीच्या हायव्होल्टेज सभा सुरु आहे. राज ठाकरे, पंतप्रधान मोदी, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवारांसह महायुतीचे सर्वच दिग्गज नेते उपस्थित होते. यावेळी सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर होमग्राऊंडवरच शाब्दिक हल्ला केला आहे. 'बाप चोरला, पक्ष चोरला, गजनी, अर्धटवराव असे शब्द वापरल्याशिवाय उद्धव ठाकरे यांचे भाषण होत नाही. मला बाळासाहेब ठाकरे यांची गर्जना आठवतेय जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो भगिनींनो आणि मातांनो. काल परवा उद्धव ठाकरे देखील ही घोषणा देत होते... आता इंडिया आघाडीमुळे देत नाही अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली.'

मोदींनी १४० कोटी भारतीयांना लस दिली – कोविडचा तो काळ आठवा, त्या काळामध्ये आपल्या नातेवाईंकासोबत संबंध दाखवत नव्हते. काय होईल ही चिंता होती. भारतामध्ये ४०-५० कोटी लोकं मरतील, असे जगातील लोकं म्हणत होते. चारच देशांनी कोविडची लस तयार केली होती.त्यांच्याकडे लस मागितली तर ते म्हणतील आधी आमच्या लोकांना लस देतो अन्यथा ते मरतील. त्यानंतर मोदींनी देशातील शास्त्रज्ञाना एकत्र केले. लस तयार करणारा भारत पाचवा देश ठरला. मोदीजी कोविडची लस देत होते, त्यावेळी मुंबईत उद्धवजीच्या नेतृत्वात खिचडीचा घोटाळा चालू होता. रेमडिसिव्हर, ऑक्सिजन घोटाळा चालू होता. प्रेताच्या टाळूवरील लोणी खाण काय असते, ते आम्हाला समजलं... कोविड बॉडी बॅगचा घोटाळा यांनी केला. खिचडी चोर आणि कफन चोर आम्ही पाहत होतो.. मोदी एक

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

- जागा : ५३४७
- पदाचे नाव: विद्युत सहाय्यक
- शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.
- वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

हिंदुस्थान उर्वरक आणि रसायन लिमिटेड

- जागा : ८०

१ मॅनेजर / (L2)
२ इंजिनिअर/ (L-1)
३ ऑफिसर/ (L-1)
४ चीफ मॅनेजर/ (L-3)
५ असिस्टंट मॅनेजर/(L1) FTC
६ ऑफिसर/(L1) FTC

- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/B.Sc. (-gri)+ M.Sc./CA/CMA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/ MBA/CA/CMA (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) CA/CMA/ PGDM²/ MBA (Finance) (ii) १९ वर्षे अनुभव
पद क्र.५: (i) ६०% गुणांसह पदवी/PG डिप्लोमा (Communication/ -dvertising Communication Management/Public Relations/ Mass Communication/ Journalism) किंवा MBA/MSW किंवा B.Sc. (Agri)+ M.Sc.(Agriculture) किंवा BSc.Agri/B.Tech+ MBA/PGDBM² (ii) ०७ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) LLB (ii) ०५ वर्षे अनुभव

- वयाची अट: २० मे २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

पद क्र.१: ४० वर्षांपर्यंत
पद क्र.२: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.३: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.४: ४७ वर्षांपर्यंत
पद क्र.५: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.६: ३५ वर्षांपर्यंत

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- फी : फी नाही.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://hurl.net.in/

यूपीएससीमार्फत संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा २०२४

- परीक्षेचे नाव: संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा (CDS-II) २०२४
- पदाचे नाव/कोर्सचे नाव

१ भारतीय भूदल (मिलिटरी) अकॅडेमी, डेहराडून १५९
२ भारतीय नेव्हल अकॅडेमी, एझीमाला, Executive (General Service)/Hydro
३ हवाई दल अकॅडेमी, हैदराबाद,No. 218 F(P) Course
४ ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडेमी (पुरुष) चेन्नई, 122nd SSC (Men) Course (NT)
५ ऑफिसर्स ट्रेनिंग कॅडमी (महिला) चेन्नई,-36th SSC Women (Non-Technical) Course

- जागा : ४५९
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: पदवीधर.
पद क्र.२: इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: पदवी (Physics and Mathematics at 10+2 level) किंवा इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.४: पदवीधर.
पद क्र.५: पदवीधर.

- वयाची अट:

पद क्र.१: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००६ दरम्यान.
पद क्र.२: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००६ दरम्यान.
पद क्र.३: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००५ दरम्यान.
पद क्र.४: जन्म ०२ जुलै २००० ते ०१ जुलै २००६ दरम्यान.
पद क्र.५: जन्म ०२ जुलै २००० ते ०१ जुलै २००६ दरम्यान.

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०४ जून २०२४
- लेखी परीक्षा: ०१ सप्टेंबर २०२४

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

- पदाचे नाव : विद्युत सहाय्यक

शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.

- वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० जून २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

आर्ममेंट रिसर्च डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट

- जागा : २०
- ज्युनियर रिसर्च फेलो
- रिसर्च असोसिएट
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: प्रथम श्रेणी BE/B.Tech+NET/ GATE किंवा प्रथम श्रेणी M.Sc+NET
पद क्र.२: (i) PhD (ii) ME/M.Tech (iii) ०३ वर्षे अनुभव

वयाची अट: २८ वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: पुणे
- अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Director, Armament Research Development Establishment (ARDE), Armament Post, Pashan, Pune-411021
- अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३१ मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.drdo.gov.in/drdo/labs-and-establishments/armament-research-development-establishment-arde

भारतीय हवाई दलात अग्निवीरवायु (संगीतकार) पदाची भरती

- कोर्सचे नाव: अग्निवीरवायु इनटेक ०१/२०२५

जागा : पद संख्या तूर्तास निर्दिष्ट नाही.
पदाचे नाव: अग्निवीरवायु (संगीतकार)

- शैक्षणिक पात्रता: (i) १०वी उत्तीर्ण (ii) संगीत अनुभव प्रमाणपत्र/डिप्लोमा
- शारीरिक पात्रता: उंची/छाती पुरुष महिला , उंची १६२ सेमी १५२ से.मी.

छाती ७७ से.मी./किमान ०५ सेमी फुगवून. -
वयाची अट: जन्म ०२ जानेवारी २००४ ते ०२ जुलै २००७ दरम्यान.

- वय गणकयंत्र: वय मोजा
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ जून २०२
- मेळाव्याचा कालावधी: ०३ ते १२ जुलै २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://indianairforce.nic.in/

इंडियन आर्मी डेंटल कॉर्प्स भरती २०२४

- पदाचे नाव: शार्ट सर्विस कमिशन ऑफिसर
- शैक्षणिक पात्रता: (i) ५५% गुणांसह BDS/MDS (ii) एक वर्षाची रोटेटरी इंटर्नशिप पूर्ण (iii) NEET (MDS)-२०२४
- वयाची अट: ३१ डिसेंबर २०२४ रोजी ४५ वर्षांपर्यंत.
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ जून २०२४
- अधिकृत वेबसाईट : https://www.indianarmy.nic.in/

ठाणे जिल्ह्यातील निवडणूक तयारीचा राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी घेतला आढावा

मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत : एस.चोक्कलिंगम

ठाणे : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक च्या ठाणे जिल्ह्यातील तयारीचा प्रधान सचिव व राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी आज निवडणूक तयारीचा आढावा घेतला. ठाणे जिल्ह्यातील मतदान प्रक्रिया सुरळीत, निर्भिड व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे तसेच जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मतदानाच्या दिवशी घरोघरी प्रतिनिधी पाठवून मतदानासाठी नागरिकांना आवाहन करण्याचे निर्देशही चोक्कलिंग यांनी दिले.राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोक्कलिंगम हे ठाणे जिल्ह्यातील २३ भिवंडी, २४ कल्याण व २५ ठाणे या लोकसभा मतदारसंघातील निवडणूक तयारीचा आढावा घेण्यासाठी ठाणे जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी जिल्हा नियोजन भवनच्या समिती सभागृहात निवडणुकीशी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधिकारी, नोडल अधिकारी यांच्याशी चोक्कलिंगम यांनी संवाद साधून माहिती घेतली व आवश्यक सूचना केल्या. यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, ठाण्याचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, मीरा भाईंदर वसई विरारचे पोलीस आयुक्त मधुकर पांडे, नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ.डी. एस. स्वामी, पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे, जिल्ह्यातील तीनही लोकसभा मतदारसंघांचे निवडणूक निर्णय अधिकारी, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) अर्चना कदम, सर्व नोडल अधिकारी, इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील निवडणुकीच्या संपूर्ण तयारीची माहिती जिल्हाधिकारी शिनगारे यांनी दिली. तसेच कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात केलेल्या तयारीची माहिती संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.

सोसायट्यांच्या सचिव/अध्यक्षांच्या मदतीने मतदान टक्केवारीसाठी प्रयत्न करा

चोक्कलिंगम म्हणाले की, लोकशाहीतील निवडणूक प्रक्रियेत प्रशासनाची भूमिका अतिशय महत्वाची आहे. पादर्शक व निर्भिड वातावरणात निवडणूक पार पाडण्यासाठी जिल्ह्यातील सर्वांनी एकत्रित काम करावे. ठाणे जिल्ह्यात मागील निवडणुकीत कमी मतदान झाले होते. यावेळी मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.त्यासाठी मतदानाच्या दिवशी आशा व अंगणवाडी स्वयंसेविका, तलाठी, ग्रामसेवक, स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी यांना घरोघरी पाठवून नागरिकांना मतदानासाठी आवाहन करण्यासाठी प्रोत्साहित करावे. शहरी भागातील सोसायट्यांमधील नागरिकांनी मतदान करावे, यासाठी त्या सोसायट्यांच्या सचिव व अध्यक्षांची मदत घ्यावी. त्यासाठी सचिव व अध्यक्षांना केंद्रस्तरीय मतदान अधिकारी (बीएलओ) म्हणून घोषित करावे. शाळा व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या मार्फत पालकांपर्यंत संदेश पोहचवावा..माथाडी कामगार, विविध उद्योगातील कामगार, कर्मचारी यांनी मतदान करावे, यासाठी संबंधित उद्योग/संस्थांच्या प्रतिनिधींशी तसेच कामगार संघटनांशी संपर्क साधून आवाहन करावे. तृतीयपंथी, देहविक्री व्यवसायातील महिलांचे मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

सेलिब्रेटींकडून आवाहन करावे

मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जनजागृतीसाठी सेलिब्रिटी, मान्यवरांची मदत घ्यावी. मतदानाचे आवाहन करणारी व्हिडिओ, रिल्स तयार करून ते ट्विटर, फेसबुक आदी समाजमाध्यमांतून प्रसारित करावे. तसेच मतदानाच्या दिवशी मतदान केलेल्या सेलिब्रेटींचे आवाहनाचे बाईटही समाजमाध्यमांद्वारे प्रसारित करावेत.

मतदान केंद्रांची माहितीसाठी गुगल मॅपचा वापर करावा

मतदानासाठी मतदान केंद्रावर येणाऱ्या नागरिकांना सुखद वाटावे, यासाठी केंद्रात व परिसरात वातावरण निर्मिती करण्यात यावी. पिण्याचे पाणी, शौचालयाची व्यवस्था, व्हिलचेअर, सेल्फी पॉईंट आदींची सोय करावी. तसेच मतदारांना रांगेत जास्त वेळ उभे राहू नये, यासाठी प्रत्येक केंद्रावर प्रतिक्षा कक्ष उभारता येईल का हे पाहावे. जिल्ह्यातील एकूण मतदान केंद्रापैकी ५० टक्के मतदान केंद्रावर वेबकास्टिंगची सुविधा द्यावी. तसेच मतदान केंद्रांची जागा सुलभपणे सापडण्यासाठी क्यूआर कोड, गुगल मॅपचा वापर करून माहिती द्यावी. जेणेकरून मतदारांना मतदान केंद्रावर पोहचण्यास अडचणी येणार नाहीत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

आचारसंहिता भंगाविरुद्ध गुन्हे दाखल करा

शांततेत व निर्भिड वातावरणात मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी पोलीस विभागाने काळजी घ्यावी. पुरेशा प्रमाणात बंदोबस्त ठेवावा. तसेच आचारसंहिता भंग होत असल्यास तातडीने गुन्हे दाखल करावे. तसेच कोणत्या प्रकारे कायदा सुव्यवस्थेचा भंग होणार नाही, याची दक्षता पोलीस विभागाने घ्यावी. तसेच चुकीची माहिती प्रसारित होत असल्यास त्याचे तातडीने खंडन करावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

मतदारांना मतदान केंद्रावर गेल्यावर मतदार यादीत नाव न सापडण्याच्या, नावे गायब होण्याच्या तक्रारी मतदानाच्या दिवशी येत असतात. अनेक मतदारांची नावे ही दुसऱ्या मतदार यादीत गेलेली आढळून येतात, त्यामुळे त्यांना नावे सापडत नाहीत. अशा मतदारांना मदत करण्यासाठी व तक्रारींची दखल घेऊन नावे शोधण्यासाठी हेल्पडेस्क तयार करण्याचे निर्देशही चोक्कलिंगम यांनी दिले.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. शिनगारे, तीनही पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, तीनही मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतदारसंघात केलेल्या तयारीची माहिती सादर केली.

मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांची ठाण्यातील स्ट्राँगरुमला भेट

ठाणे : राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव श्री. एस.चोकलिंगम यांनी आज ठाण्यातील होरायझन स्कूल या ठिकाणी असलेल्या ईव्हीएम स्ट्राँग रुमला भेट देवून लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगिक तयारीची पाहणी केली. ठाणे जिल्ह्यात येत्या २० मे २०२४ रोजी मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. ही प्रक्रिया पार पडल्यानंतर लोकसभा मतदारसंघ निहाय ईव्हीएम मशिन स्ट्राँगरुमध्ये ठेवण्यात येणार आहेत. २५ ठाणे लोकसभा मतदारसंघातील स्ट्राँग रुम होरायझन स्कूल येथे आहे. या स्ट्राँग रुमची पाहणी आज मुख्य निवडणूक अधिकारी चोक्कलिंगम यांनी केली. यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, २५ ठाणे लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा जायभाये आदीउपस्थित होते. यावेळी शिनगारे व श्रीमती जायभाये यांनी केलेल्या तयारीची माहिती दिली. श्री. चोक्कलिंगम यांनी स्ट्राँगरुमची व्यवस्था चांगली केल्याचे समाधान व्यक्त केले.

क्यूआरकोड प्रणालीच्या माध्यमातून मतदारांना मिळणार मतदानकेंद्राची माहिती

ठाणे : येत्या २० मे २०२४ रोजी नागरिकांना मतदानासाठी मतदान केंद्रावर जाणे सोईचे व्हावे किंबहुना आपले मतदान केंद्र कुठे आहे याची माहिती क्यूआर कोडच्या माध्यमातून मिळणार आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांच्या संकल्पनेतून जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे आणि जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे यांच्या माध्यमातून Election Atlas for Thane District For General Parliamentary Elections -2024 ही बारकोड प्रणाली तयार करण्यात आली आहे.

मतदानाच्या दिवशी मतदाराला मतदान केंद्रावर पोहचणे सहज शक्य व्हावे यासाठी Election atlas for Thane District For General Parliamentary Elections -2024 ही बारकोड प्रणाली तयार करण्यात आले आहे. यामध्ये २३ भिवंडी, २४ कल्याण, २५ ठाणे या तीन लोकसभा मतदारसंघासाठी स्वतंत्र क्यू आर कोड तयार करण्यात आले आहे. मतदार जर ठाण्यातील असेल तर त्यांनी ठाणे लोकसभा मतदारसंघासाठी असलेला क्यू आर कोड स्कॅन केल्यास त्यावर ठाण्यातील सर्व मतदान केंद्र दिसतील. त्यानंतर मतदारांनी मतदार स्लीपवरील मतदान केंद्र क्रमांक क्लिक केल्यास मतदान केंद्र कुठे आहे,किती अंतरावर आहे, तसेच मतदान केंद्राकडे कसे जायचे याचा गुगल मॅप उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागरिकांना सहजरित्या पोहचता येणार आहे.

Election Atlas for Thane District For General Parliamentary Elections -2024 ही बारकोड प्रणाली जिल्हा समन्वय अधिकारी (संचार आराखडा) सुनील महाले, महेंद्रकुमार मेटकरी - परिवहन अभियंता, सिडको, अबू अमीर, उपविभाग अभियंता तसेच सहाय्यक जिल्हा समन्वय अधिकारी (संचार आराखडा) अनिकेत खांडेकर, सहाय्यक अभियंता, सिडको, अभिषेक चव्हाण, सहाय्यक परिवहन अभियंता, सिडको, राहुल कापडणीस, सहाय्यक परिवहन अभियंता, सिडको यांनी तयार केली आहे.

मतदाराला मतदान केंद्रापर्यंत जाणे सहज सोपे व्हावे व सदरचे क्यू आरकोड हे मतदारांपर्यंत पोहचावे यासाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईटवर, फेसबुक पेजवर, तसेच व्हॉटसच्या माध्यमातून याची व्यापक प्रमाणात प्रसिद्धी करण्यात येत आहे. तसेच भिवंडी, कल्याण, ठाणे या मतदारसंघातील नागरिकांपर्यंत विविध माध्यमातून सदर क्यू आर कोडची माहिती उपलब्ध केली जाणार असल्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी नमूद केले.

स्वीप पथकामार्फत ढोल पथकाबरोबरही मतदार जनजागृती

ठाणे : ठाणे जिल्ह्यात २४ कल्याण लोकसभा मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जिल्हा प्रशासन, महापालिका प्रशासन, निवडणूक यंत्रणा अविरत प्रयत्न करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज १४२ कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघाच्या स्वीप टीमने कल्याण पूर्व येथील बासुरीवाला ढोलपथकाच्या सदस्यांना मतदानाचे महत्त्व पटवून देऊन मतदान करण्याचे आवाहन केले. २४ कल्याण लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाच्या स्विप पथकाच्या वतीने विविध माध्यमातून मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. सोशल मीडिया, प्रिंट मीडिया यासह वेगवेगळे उपक्रमाद्वारे सातत्याने मतदान जनजागृती करून मतदान जनजागृतीचा हा जागर जनमानसाच्या मनामनात बिंबविला जात आहे. १४२- कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघातील स्वीप पथकही अनेकविध उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदार जनजागृती करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज १४२ कल्याण पूर्व विधानसभामतदारसंघाच्या स्वीप टीमने कल्याण पूर्व येथील बासुरीवाला ढोलपथकाच्या कलाकारासमोर मतदान जनजागृतीचे सादरीकरण केले. यावेळी तेथे उपस्थित ढोल पथकातील सादरकर्ते ढोलवादक/ विद्यार्थी- प्रामुख्याने नवमतदार, त्यांचे प्रशिक्षक यांनाही यावेळी मतदान करण्यासाठी आवाहन करण्यात आले.

ठाण्यातील १५० शाळांमध्ये सर्वंकष स्वच्छता अभियान

मतदान केंद्र आणि परिसर स्वच्छ करण्यावर भर

महापालिका आणि खाजगी शाळांचा सहभाग

ठाणे (मेधा भोईटे) : लोकसभा निवडणुकीसाठी सोमवार, २० मे रोजी होत असलेल्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी ठाणे महापालिका क्षेत्रातील १५० शाळा आणि त्यांच्या परिसरात सर्वंकष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. मतदान केंद्र आणि परिसर स्वच्छ करण्यावर या अभियानात भर देण्यात आला.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी ठाणे महापालिका क्षेत्रात असलेल्या सर्व शाळांमधील मतदान केंद्रे, तसेच आजूबाजूचा परिसर स्वच्छ करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, शुक्रवारी सकाळी सर्व शाळांमध्ये सफाई मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात, महापालिका आणि जिल्हा परिषदेच्या ६२ शाळा, आणि ८८ खाजगी शाळा अशा १५० शाळांचा समावेश होता.

नागरिकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी

या मोहिमेची सुरूवात कोपरी येथील महापालिका शाळा क्रमांक १६ येथे करण्यात आली. या शाळेतील मतदान केंद्रांची सफाई करण्यात आली. तसेच, परिसरही स्वच्छ करण्यात आला. यावेळी, अतिरीक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) तुषार पवार, उपायुक्त (शिक्षण) सचिन पवार, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, सहायक आयुक्त सोपान भाईक आदी वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी या सफाई मोहिमेत सहभागी झाले.

सर्व मतदान केंद्र आणि परिसराची व्यवस्थित सफाई करण्यात यावी. तसेच, नागरिकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी, अशा सूचना यावेळी अतिरीक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी दिल्या.

■ नालेसफाईची पाहणी करताना उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) तुषार पवार, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, सहाय्यक आयुक्त सोपान भाईक.

नालेसफाई केल्यावर काढून ठेवलेला

गाळ तत्काळ उचलण्यात यावा

अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांचे निर्देश

■ ठाणे (गणेश भोईटे)

ठाणे महापालिका क्षेत्रात सध्या नालेसफाईची कामे सुरू आहेत. या नाल्यातून मोठ्या प्रमाणावर गाळ, कचरा काढला जात असून तो रस्त्यावर जास्त काळ न ठेवता तत्काळ उचलण्यात यावा. परिसरात दुर्गंधी पसरू नये, अशा सूचना ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी दिल्या आहेत.

■ *अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी शुक्रवारी नौपाडा, कोपरी, वागळे इस्टेट या भागातील नालेसफाईच्या कामांची पाहणी केली. त्यावेळी त्यांनी गाळ उचलण्याबाबत सूचना दिला. ज्ञानसाधना महाविद्यालयाजवळील नाल्याच्या कामाचीही पाहणी रोडे यांनी केली.*

■ *नालेसफाईच्या कामांचा वेग वाढवून कोणत्याही परिस्थितीत नियोजित वेळेत ही कामे पूर्ण करण्यात यावे. त्यासाठी दैनंदिन स्वरुपात या कामांचा आढावा घेण्याच्या सूचनाही रोडे यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागास दिला.*

■ *या पाहणीच्या वेळी उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) तुषार पवार, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, सहाय्यक आयुक्त सोपान भाईक आदी उपस्थित होते.*

लोखंड पोलाद बाजारातील गोदामात गुटख्याची साठवणूक

पनवेल : कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजाराच्या गोदामामध्ये यापूर्वी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी धाड टाकून लाखो रुपयांचा मद्यसाठा जप्त केला होता. दोन दिवसांपूर्वी लोखंड पोलाद बाजारातील गोदाम क्रमांक ४४९ मध्ये ४ लाख ८१ हजार ५०४ रुपयांचा गुटख्याचा साठा नवी मुंबई पोलिसांना सापडल्याने लोखंड पोलाद बाजारातील काळेधंदे पुन्हा एकदा उजेडात आले आहेत.

नवी मुंबई पोलीस दलाचे आर्थिक गुन्हे प्रतिबंध शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त धनाजी क्षीरसागर यांना कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजारात अत्ताऊल्ला शेठ याच्या गोदामामध्ये प्रतिबंधित गुटख्याचा मोठा साठा असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर नवी मुंबई पोलीस दलाच्या अंमलीपदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निरज चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश धुमाळ, पोलीस हवालदार ज्ञानेश्वर बनकर, उत्तम लोखंडे, गणेश पवार, पोलीस नाईक संजय फुलकर यांच्या पथकाने सापळा रचून केलेल्या कारवाईमध्ये अताऊल्ला याच्या गोदामामध्ये प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, तंबाखुचा साठा आढळला. यापूर्वीसुद्धा याच परिसरात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटख्याचा साठा अन्न औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पकडला होता. त्यानंतरसुद्धा अताऊल्ला याने गुटख्याचा साठा केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

अताऊल्ला याला पोलीस आणि अन्न औषध प्रशासन विभागातील काही कर्मचाऱ्यांची साथ असल्याने वारंवार कारवाई होऊनही पनवेल, कळंबोली, कामोठे, तळोजा या परिसरात राजरोज पानटपऱ्यांवर गुटख्याची विक्री सुरु आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नशामुक्त नवी मुंबई ही मोहीम हाती घेतली. या मोहिमेअंतर्गत पोलिसांचे अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पथक अंमली पदार्थ विकणाऱ्यांना पकडत आहे. मात्र पोलीस व अन्न औषध प्रशासन विभागातील काही नतद्रष्ट कर्मचाऱ्यांमुळे अंमलीपदार्थ पकडण्यासाठी नेमलेल्या पोलिसांना गुटखा विक्रीकडे लक्ष्य केंद्रित करावे लागत आहे. अताऊल्ला याची सखोल चौकशी केल्यावर त्याने एवढा मोठा गुटख्याचा साठा कुठून आणला. तसेच गोदामात पोलिसांनी धाड टाकण्यापूर्वी आणि धाड टाकल्यानंतर त्याने कोणकोणत्या पोलिसांना व सरकारी अधिकाऱ्यांना संपर्क केला याची सखोल चौकशी केल्यास पनवेलचा अवैध गुटखा व्यापारावर काही प्रमाणात प्रतिबंध लागू शकेल.

आज कामोठेत कुस्तीच्या दंगली

पनवेल : पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते डॅशिंग युवा नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'मा. श्री. परेश ठाकूर केसरी पनवेल २०२४' या भव्य कुस्त्यांचे जंगी सामने अर्थात कुस्तीच्या दंगली शनिवार दिनांक १८ मे रोजी सायंकाळी ०४ वाजता कामोठे येथील सेक्टर ११ मधील नालंदा बुद्धविहाराच्या जवळील मैदानावर होणार आहेत.

या जंगी सामन्यांचे उदघाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष माजी खासदार रामदास तडस आणि सचिव हिंदकेसरी पै. योगेश दोडके यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी, कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे तसेच भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, जिल्हा उपाध्यक्ष के. के. म्हात्रे, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, खारघर अध्यक्ष प्रविण पाटील, कुस्ती असोसिएशनचे अध्यक्ष बळीराम पाटील, भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी नगरसेवक दिलीप पाटील, डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, विकास घरत, गोपीनाथ भगत, माजी नगरसेविका हेमलता गोवारी, शिला भगत, कुसूम म्हात्रे, अरुणा भगत, पुष्पा कुत्तरवडे, युवा नेते हॅप्पी सिंग, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर यांच्यासह, तालुका कुस्तीगीर असोसिएशनचे सदस्य यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

पोलीस निवडणूक बंदोबस्तावर असल्याने

कल्याण, डोंबिवलीत घरफोड्या वाढल्या

कल्याण : कल्याण, डोंबिवली हद्दीतील पोलीस लोकसभा निवडणूक कामावर व्यस्त असल्याने रात्रीच्या वेळेत घरफोड्यांचे प्रमाण वाढले आहे. या आठवड्यात सलग चार दिवस कल्याण पूर्वे, डोंबिवलीत घरफोड्या करून चोरट्यांनी लाखो रूपयांचा ऐवज लांबविला आहे.

दोन दिवसापूर्वी कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी, काटेमानिवली भागात घरफोड्या झाल्याच्या तक्रारी आहेत. या घटना ताज्या असतानाच डोंबिवलीत विष्णुनगरमध्ये आणि कल्याणमध्ये कोळसेवाडी पोलीस ठाणे हद्दीत चोरीच्या घटना घडल्या आहेत.

डोंबिवली पश्चिमेतील कोपर हद्दीत तुळशी पवार या महिला राहतात. त्या कोपर छेद रस्त्यावरील नील कमल बंगल्या शेजारील अजित पवार चाळ भागात राहतात. मंगळवारी, बुधवारी त्या काही कामानिमित्त आपल्या नातेवाईकांकडे गेल्या होत्या. या संधीचा फायदा घेऊन पाळत ठेऊन असलेल्या चोरट्यांनी त्यांच्या बंद घराचा कडीकोयंडा, कुलूप तोडून घरात प्रवेश केला. घरातील लोखंडी कपाटातील तिजोरीत असलेले दोन लाख ४५ हजार रूपयांचे सोन्याचे दागिने, काही रोख रक्कम असा ऐवज लुटून पलायन केले.

असाच प्रकार कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी पोलीस ठाणे हद्दीतील खडेगोळवली भागातील कृष्णा उपाध्याय चाळीत घडला आहे. या चाळीत राहणाऱ्या तक्रारदार पौर्णिमा जाधव या रविवारी आपल्या नातेवाईकांच्या शेजारील घरी वाढदिवस कार्यक्रमासाठी कुटुंबासह गेल्या होत्या. यावेळी पाळत ठेऊन असलेल्या भुरट्या चोराने जाधव यांच्या घरात कोणीही नाही या संधीचा गैरफायदा घेत त्यांच्या घरात प्रवेश केला. त्यांच्या घरातील लोखंडी कपाटातील तिजोरीत ठेवलेले सोन्याचे दागिने, रोख रक्कम असा एकूण एक लाख ८१ हजार रूपयांचा ऐवज चोरून नेला.

पौर्णिमा जाधव कार्यक्रम उरकून घरी आल्या तेव्हा त्यांना घराचा दरवाजा उघडा असल्याचे दिसले. त्यांना संशय आला. त्यांनी कपाटातील तिजोरी पाहिली तर त्यात ठेवलेला ऐवज नसल्याचे दिसले. चोरट्याने चोरी केल्याने त्यांनी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.

अनधिकृत होर्डिंग विरोधी कारवाई दुसऱ्या दिवशीही सकाळपासून पहाटेपर्यंत प्रभावीपणे सुरू

नवी मुंबई : राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे अतिक्रमण विभागामार्फत अनधिकृत होर्डिंग विरोधातील कारवाई दुसऱ्या दिवशीही सकाळपासून पहाटेपर्यंत अधिक प्रभावीपणे सुरू ठेवण्यात आली असून घणसोली, कोपरखैरणे व तुर्भे विभागातील पाच मोठे होर्डिंग हटवण्यात आलेले आहेत.

अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या नियंत्रणाखाली सर्व विभागांचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी व त्यांचे अधिनस्त सहकारी यांनी तांत्रिक समुहासह अनधिकृत होर्डिंग हटाव मोहीम सलग दोन दिवस पहाटेपर्यंत प्रभावीपणे राबवली.

घणसोली विभागात ठाणे बेलापूर सर्विस रोड येथे हॉटेल रामडा, औरम निवासी संकुल येथील २ मोठे होर्डिंग निष्काषित करण्यात आले.

त्याचप्रमाणे ठाणे बेलापूर रोडवर कोपरखैरणे विभागात एमआयडीसीच्या फायर ब्रिगेड जवळ असलेले फार मोठ्या आकाराचे होर्डिंगही हटविण्यात आले.

तुर्भे विभागामध्ये एपीएमसी मार्केट येथील एक मोठे अनधिकृत होर्डिंग तसेच तुर्भे रेल्वे स्टेशन नजीकची पदपथावर असलेली दोन मोठी अनधिकृत होर्डिंग पहाटेपर्यंत काम करून निष्कासित करण्यात आली. आजही वाशी विभागात हायवेनजिकचे मोठे होर्डींग निष्कासित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

विभाग कार्यालयांमार्फत त्यांच्या हद्दीतील अनधिकृत होर्डिंगचे सर्वेक्षण करण्यात आले असून महापालिका आयुक्त यांचे आदेशानुसार अनधिकृत होर्डिंग विरोधातील कारवाई तीव्र करण्यात आली आहे. यामध्ये दोषी आढळणाऱ्यांवर फौजदारी तसेच दंडात्मक कारवाईदेखील करण्यात येणार आहे असे अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ. राहुल गेठे यांनी स्पष्ट केले.

आरटीईअंतर्गत २५% प्रवेश प्रक्रियेसाठी बालकांच्या पालकांना आवाहन

नवी मुंबई : सन २०२४-२५ या आरटीई २५% प्रवेश प्रक्रियेसाठी यापूर्वी दि. १७ एप्रिल ते १० मे २०२४ पर्यंत बालकांच्या पालकांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. तथापि उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही प्रक्रिया स्थगित करण्यात आलेली आहे.

त्यामुळे मागील वर्षी प्रमाणे सन २०२४-२५ या वर्षासाठी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १२ (सी) (१) नुसार दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळा, पोलीस कल्याणकारी शाळा (विना अनुदानित) आणि महानगरपालिका शाळा (स्वयं अर्थसहाय्यित शाळा) या शाळांमध्ये आरटीई २५% प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता ठढए २५% ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये एकूण ९८ पात्र शाळा आहेत.

RTE २५% ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेंतर्गत बालकांच्या अर्ज नोंदणीसाठी महाराष्ट्र शासनाकडून https://student.maharashtra.gov.in/admsportal/Users/rtesindexsnew या वेबसाईटवर दि. १७ ते ३१ मे २०२४ पर्यंत सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

पालकांसाठी मदत केंद्रांची यादी (Help Centers), ऑनलाईन प्रक्रियेत अर्ज नोंदणीबाबत मार्गदर्शक पुस्तिका, आवश्यक कागदपत्रे इत्यादींबाबत सर्व माहिती शासनाच्या वरील वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

कल्याण लोकसभेत चार महिन्यात वाढले ८३ हजार नवमतदार

डोंबिवली : कल्याण लोकसभा मतदारसंघात ३ जानेवारी २४ ते ३ मे २०४ या कालावधीत करण्यात आलेल्या नव मतदार नोंदणी मोहिमेत एकूण ८३ हजार ८०७ मतदारांनी आपली नावे मतदार यादीत नोंदवली. हे नव मतदार प्रथमच कल्याण लोकसभा आणि पुढील होणाऱ्या निवडणुकांसाठी यापुढे मतदान करतील, अशी माहिती कल्याण लोकसभेच्या निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते यांनी गुरूवारी सावळाराम महाराज क्रीडासंकुलातील निवडणूक कार्यालयात दिली. ३ जानेवारीपर्यंत कल्याण लोकसभा मतदारसंघाची मतदार संख्या १९ लाख ९८ हजार ४२४ होती. जानेवारी ते ३ मे या कालावधीत निवडणूक आयोगाकडून नव मतदार नोंदणी मोहीम विविध स्तरावर राबविण्यात आली. या मोहिमेच्या माध्यमातून कल्याण लोकसभा मतदारसंघात ८३ हजार ८०७ नव मतदारांनी मतदार यादीत नाव नोंदणी केली. त्यामुळे आता कल्याण लोकसभा मतदारसंघातील मतदारांची संख्या २० लाख ८२ हजार २३१ आहे, असे सातपुते यांनी सांगितले. कल्याण लोकसभा हद्दीतील सहा विधानसभा मतदारसंघात एक हजार ९६० मतदान केंद्रे आहेत. यावेळी या मतदार संघात एकही संवेदनशील मतदान केंद्र नाही. एकाच भागात १० पेक्षा अधिक मतदान केंद्रे असलेल्या एक हजार १२ ठिकाणी वेब कास्टिंग आणि तेथे सीसीटीव्हीची व्यवस्था करण्यात आली आहे. या केंद्रातील मतदान प्रक्रियेचे (मतदान कक्ष वगळून) काम निवडणूक नियंत्रण अधिकारी कक्षात बसून पाहू शकणार आहेत. प्रत्येक मतदान केंद्रांवर अपंगांसाठी रॅम्प, व्हिलचेअर सज्ज ठेवली जाणार आहे. याशिवाय स्वच्छतागृह, पाणी, औषधांचा संच तयार ठेवण्यात येणार आहे. मतदान केंद्रांच्या ठिकाणी साहाय्यक म्हणून आशा सेविका, आरोग्य सेविकांची नेमणूक केली जाणार आहे.

उत्सव..

गोडदेव गांव, सेना नगर, गोडदेव मच्छिमार्केट, अभिनव शाळा परिसर भाईंदर येथे स्वीपअंतर्गत मतदारांमध्ये जनजागृती करताना.

ठाणे पूर धोका नियंत्रण कृती आराखड्यामुळे आपत्ती नियंत्रण जलद होईल : आयुक्त सौरभ राव

कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हार्यन्मेंट ॲण्ड वॉटर या संस्थेचे सहकार्य

ठाणे : ठाणे महापालिका क्षेत्रात कोणतीही नैसर्गिक आपत्ती येणार असेल तर त्याची आगाऊ सूचना नागरिकांना मिळावी, यासाठी सक्षम यंत्रणा तयार करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. या प्रकारच्या यंत्रणेची आवश्यकता या प्राथमिक कृती आराखड्यामुळे अधोरेखित झाली आहे. एखाद्या आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर त्याच्याशी निगडित यंत्रणांनी कशाप्रकारे जलद गतीने त्या आपत्तीचा सामना करावा, त्याचे अपेक्षित परिणाम काय आहेत, याची एक प्रमाणित कार्यपद्धती तयार करण्यास ठाणे पूर धोका नियंत्रण कृती आराखड्याची मदत होईल, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात अतिवृष्टीच्या काळात साचणाऱ्या पाण्यामुळे निर्माण होणाऱ्या पूर स्थितीचा धोका नियंत्रणात आणण्यासाठी ठाणे पूर धोका नियंत्रण कृती आराखडा तयार करण्यात येत आहे. या आराखड्याची प्राथमिक रुपरेषा गुरूवारी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांना सादर करण्यात आली.

अतिवृष्टीच्या काळात सखल भागात साठणारे पाणी, भरतीच्या काळात असताना पावसाच्या पाण्याला खाडीत जाण्यापासून होणारा अडथळा, महापालिका क्षेत्रातील पर्जन्य जल वाहिन्यांचे जाळे, नाल्यातील कचऱ्याचा उपद्रव आदींमुळे वेगवेगळ्या भागात मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. काही प्रसंगात जीवितहानी होण्याचीही भीती असते. या सर्व स्थितीचा अभ्यास करून ही पूर सदृश स्थिती कशी हाताळायची, त्यावर नियंत्रण कसे मिळवायचे याचा कृती आराखडा तयार करण्यात येत आहे. ठाणे महापालिकेसाठी कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हार्यन्मेंट ॲण्ड वॉटर (सीईईडब्ल्यू) ही वातावरण बदल क्षेत्रात काम करणारी अग्रगण्य संस्था या कृती आराखड्याचे काम करत आहेत. याच संस्थेने महाराष्ट्र शासन, ठाणे महानगरपालिका यांच्यासोबत ठाणे महापालिका क्षेत्रासाठी उष्णता उपाययोजना कृती आराखडाही तयार केला आहे.

आपत्ती नियंत्रणात प्रत्यक्ष घटनास्थळी काम करणारे कर्मचारी यांचे अद्ययावत प्रशिक्षण आणि नागरिकांमध्ये कमालीची जागरूकता या दोन गोष्टींचाही उहापोह या कृती आराखड्यात करण्यात आला आहे. तो महत्त्वाचा असून एखाद्या आपत्तीचा सामना करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ हाताशी असल्यास प्रतिसाद जलद देता येतो. त्याशिवाय, माध्यमांच्या मदतीने नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांनाही आपत्तीबाबत सजग करता येते. आवश्यकता असल्यास त्यांचे तात्पुरते विस्थापन करता येते, असेही राव यांनी स्पष्ट केले.

नाल्यात पडणारा कचरा ही शहराची मोठी समस्या आहे. हा कचरा रोखण्यासाठी काय आणि कसे उपाय करता येतील, नागरिकांचे प्रबोधन कसे करता येईल, त्यांना कचरा टाकण्यासाठी सोयीचे कोणते पर्याय देता येतील, याचा विचार करून उपाय सुचवण्याची सूचना आयुक्त राव यांनी 'सीईईडब्ल्यू'च्या प्रतिनिधींना केली.

सहा महिन्यांपासून या कृती आराखड्याचे काम सुरू आहे. महापालिकेच्या पर्यावरण विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि शहर विकास विभाग यांच्याकडून मिळालेली माहिती तसेच, आपत्ती व्यवस्थापनबाबतच्या शास्त्रीय संकल्पना आदींची सांगड घालून सीईईडब्ल्यू यांनी प्राथमिक कृती आराखडा तयार केला आहे. त्यात, पूर स्थितीस कारणीभूत घटक, त्यावरील अल्प आणि दीर्घ कालीन उपाय, त्यातून साध्य होणारा परिणाम आणि नागरिकांना त्याचा होणार उपयोग आदींबाबत मुद्द्यांचा समावेश आहे. हा प्राथमिक अहवाल आता महापालिकेच्या संबंधित सर्व विभागांना देण्यात आला असून त्यावर त्यांची मते आणि सूचना जाणून घेण्यात येणार आहेत. सीईईडब्ल्यूचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी नितीन बस्सी आणि विश्वास चितळे यांनी हा अहवालाचे सादरीकरण करून त्याची प्रत महापालिका आयुक्त सौरभ राव यांना प्रदान केली.

याप्रसंगी, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपायुक्त (आपत्ती व्यवस्थापन) जी. जी. गोदेपुरे, सहाय्यक संचालक नगररचना संग्राम कानडे, मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासीन तडवी, उपनगर अभियंता गुणवंत झांबरे आदी उपस्थित होते.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१